प्रबोधन
गोरेगाव

# प्रबोधन क्रीडा महोत्सवातून उत्तम ॲथलिट निर्माण होतील

## –महापौर श्रध्दा जाधव

मुंबई,८ (प्रतिनिधी) प्रबोधन गोरेगाव आंतरशालेय क्रीडा महोत्सव म्हणजेमिनी ऑलिम्पिक आहे. या प्रकारच्या  क्रीडा महोत्सवातून  पी.टी.उषा सारखेजगप्रसिध्द ॲथलिट निर्माण होतील असा विश्वास मुंबईच्या महापौर श्रध्दा जाधव यांनी व्यक्त केले.

प्रबोधन गोरेगाव आयोजित ३२ व्या आंतरशालेय क्रीडा महोत्सवाचेउदघाटन महापौर श्रध्दा जाधव यांच्या हस्तेझाले. याप्रसंगी बोलताना महापौरांनी प्रबोधन क्रिडा महोत्सवाबद्दल प्रशंसोद्गार काढले. शहरांच्या तुलनेत पश्चिम उपनगरातील खासगी संस्था अश्या भव्य स्वरुपाचेक्रीडा महोत्सव आयोजित करुन शहरातील खासगी संस्थासांठी आदर्श निर्माण केल्याचेही त्यांनी सांगितले.

क्रीडा महोत्सवात वांद्रे तेदहिसर दरम्यानच्या प्रबोधन आंतरशालेय क्रीडा महोत्सव १२ डिसेंबर पर्यंत चालणार आहे. आजच्या शुभारंभ प्रसंगी सहा शाळांनी ध्वज संचलन केले. खार च्या जसुदबेन एम.एल. उर्वी  टेंबें  या धावपटूनेक्रीडा  महोत्सवाची ज्योत प्रज्वलित केली. तर याच विदयालयाच्या जोसूआ बॅरिट्टोव रुक्सर सय्यद यांनी क्रीडा महोत्सवाची शपथ दिली.

महोत्सवाच्या शुभारंभ प्रसंगी महाराष्ट्र कराटे असोशिएशनचेशरिफ बाबू, नगरसेवक दिलिप शिंदे, नगरसेविका नम्रता कोलथरकर,गोरेगाव पोलिस ठाण्याचेपोलिस निरिक्षक ज्ञानेश्वर जवळकर,प्रबोधन चेअध्यक्ष डॉ.मनोहर अद्वानकर, उपाध्यक्ष जगदीश वालावलकर,पुष्कराज कोले,श्रीनिवास शिरसेकर,दिलिप खाडगे, प्रमुख कार्यवाह अनिल देसाई,कार्याध्यक्ष शशांक कामत,नितिन शिंदे, रमेश इस्वलकर, वसंत तावडे, गिरिश देसाई, विलास देवरुखकर, रमेश म्हात्रे,महादेव खानोलकर यांच्यासह प्रबोधन गोरेगावचेपदाधिकारी व शिवसेनेचेपदाधिकारी उपस्थित होते.

---